**डे. अर्ज क्र. ०१/२०१८ मधील नि. क्र. १० येथील अर्जावरील आदेश**

अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहीता १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तूत अर्जावर सामनेवाले यांनी म्हणणे दाखल करुन अर्जास प्रतिरोध केला आहे.

प्रस्तुत अर्ज, अर्जासोबतचे नि.क्र.११ येथील शपथपत्र, अर्जावरील सामनेवालांचे म्हणणे आणि अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. उभय पक्षांच्या सन्माननीय विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले.

अर्जामध्ये व शपथपत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे की, अर्जदाराने तडजोड पुरसीस व हुकूमनामा दुरुस्त होवून मिळणेसाठी अर्ज दाखल केला असून सामनेवाली क्र. १४ मालन आलदर ही मयत झालेली असून ती अविवाहीत होती, तिचे वारस सामनेवाला क्र. १२, १३ व १५ हे असुन ते प्रकरणात समाविष्ठ आहेत व तिचे इतर कोणीही वारस नाहीत, त्यामुळे सदरचे सामनेवाली क्र. १४ हिचे नावापुढे 'मयत ' लिहून दुरुस्ती करण्यास परवानगी दयावी. सामनेवालांनी असा आक्षेप घेतला आहे की, सदरील अर्ज खरा नाही व त्यामुळे रद्द करावा.

अर्जाचे अवलोकन करता अर्जात सामनेवाली क्र. १४ ही मयत असून तिचे मयत वारस सामनेवाला क्र. १२, १३ व १५ असले बाबत कथन केले आहे. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ नि.क्र. ११ येथे शपथपत्र दाखल केले आहे. सामनेवालांनी अर्जास आक्षेप घेतला असला सामनेवाली क्र. १४ मालन आलदर ही मयत असून सामनेवाले क्र. १२, १३, १५ हे तिचे वारस आहेत ही बाब त्यांनी स्पष्टपणे नाकारलेली नाही. त्यामुळे सामनेवाले यांचा आक्षेप मान्य करता येणार नाही.

दिवाणी प्रक्रिया संहीता १९०८ चे आदेश ६ नियम १७ नुसार आवश्यकता वाटल्यास संबंधीत पक्षकार यांना कथनांमध्ये दुरुस्ती करणेसंबंधी परवानगी देण्याची तरतुद आहे.

अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीचे अवलोकन करता अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे सुचित केलेली दुरुस्ती मंजूर केल्यास अर्जाचे स्वरुपामध्ये बदल होईल व सामनेवालांचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे अशी परिस्थिती दिसून येत नाही. सामनेवालांनी नमूद केलेले आक्षेप प्रस्तूत अर्ज नामंजूर करणेइतपत सबळ नाहीत. प्रस्तूत अर्ज नामंजूर केल्यास अर्जदाराचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीमध्ये न्यायाच्या दृष्टीने अर्जदारास प्रस्तावित केलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. परिणामतः मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तूचा अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदाराने अर्जामध्ये प्रस्तावित केलेली दुरुस्ती अर्जामध्ये करण्यास परवानगी देण्यात येते.

३. अर्जदाराने येणेप्रमाणे मुळ अर्ज दुरुस्त करुन दुरुस्त अर्जाच्या आवश्यक प्रती अभिलेखावर सादर कराव्यात.

४. प्रस्तूतच्या आदेशाचे निवेदन खुल्या न्यायासनासमोर अधिघोषीत केले.

**(सचिन स.पाटील)**
दिनांकः ०६ .०९.२०१८ **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला**
**जि. सोलापूर**

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Shri. S.S. Patil,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 06.09.2018 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 06.09.2018 |